पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ४

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - १७/०७/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/०७/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.बोकड रामदास गेणभाऊ - सभापती
२) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा.उल्हास शेट्टी
४) मा.भारती फरांदे
५) मा.प्रसाद शेट्टी
६) मा.काळे विमल रमेश
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**

विषय क्रमांक - १) महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा आयोजित करणेबाबत..

विषय क्रमांक - २) प्रभाग क्र.१९ रावेत स.न.९८ मध्ये क्रीडांगण व फिटनेस क्लब तयार करुन मिळणेबाबत..मा.मंदाकिनी ठाकरे,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ३) शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३ – १४ अनुषंगाने आयोजित केलेल्या सभेस उपस्थीत राहणा-या मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक यांचेकरीता चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणेबाबत.. मा. मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ४) डॉ.हेडगेवार क्रिडा संकुल मासुळकर येथील व्यायामशाळेत व्यायामाचे साहित्य मिळणेबाबत.. मा.भारती फरांदे, मा. मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ५) २९ ऑगस्ट २०१३ रोजी क्रीडा दिनानिमित्त प्रदर्शनिय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत..मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ६) मोरया गोसावी क्रिडांगण विकसित करण्याबाबत.. मा.मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ७) प्रभाग क्र.६३ मध्ये महिलांसाठी फिटनेस क्लब सुरु करुन साहित्य मिळणेबाबत...मा.मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ८) फिटनेस क्लबमध्ये साहित्य मिळणेबाबत.. मा.प्रसाद शेट्टी,मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ९) व्हॉलीबॉल खेळाचे मैदान तयार करुन मिळणेबाबत.. मा.प्रसाद शेट्टी,मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - १०) सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या व्यायामशाळेची मुदत संपुष्टात आल्याने त्यांचा ताबा मनपाकडे देणेबाबत.. मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ११) मोशी प्रभाग क्र.६ मध्ये फिटनेस क्लब सुविधा होणेबाबत..मा.भारती फरांदे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - १२) महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत....मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ३/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र. ३ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - १
दिनांक - १७/०७/२०१३ विभाग – क्रीडा
सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.भारती फरांदे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/५५८/२०१३दि.९/७/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर,चिंचवड, पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळात महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करणेस व त्या कामी येणा-या र.रु.२,००,०००/- च्या खर्चास मान्यता घेणे व कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या मंजूर दरानुसार ट्रॉफिज स्मृतिचिन्हे,चहा व अल्पोपहार व्यवस्था, पी.व्ही.सी फ्लेक्स बॅनर्स तयार करुन घेणेस व भांडार विभागाकडील निविदा मंजूर दरानुसार निमंत्रणपत्रिका, सर्टिफिकेट्स खरेदी करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - २
दिनांक - १७/०७/२०१३
सूचक - मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा. विमल काळे
संदर्भ : मा. मंदाकिनी ठाकरे,मा.विमल काळे यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.१९ रावेत स.नं.९८ मध्ये मोकळे गायरान असुन त्या ठिकाणी विविध खेळासाठी मैदान व फीटनेस क्लबची आवश्यकता असल्याने विकसीत करुन मिळावेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ३
दिनांक - १७/०७/२०१३
सूचक - मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा. भारती फरांदे
संदर्भ : मा. मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक ६/७/२०१३ रोजी सकाळी १०.०० ते ३.०० या वेळात आचार्य अत्रे रंगमंदीर, पिंपरी १८ येथे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३-१४ अनुषंगाने नियोजन सभा आयोजित केलेली होती. सदर सभेस चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणे आवश्यक होते. सदर सभा अनुषंगाने सभेस चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणेकामी क्रीडा

विभागाकडील कोटेशन नोटीस क्रमांक क्रीडा/३/कावि/२६३/२०१३ दिनांक ८/७/२०१३ अन्वये ईच्छुक पुरवठाधारकांकडुन सामोसा व चहा चे दर मागविणेकामी कोटेशन नोटीस महापालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली होती. त्यानुसार एकुण ०३ पुरवठाधारकांनी सदर चहा व अल्पोपहाराची दरपत्रके सादर केलेली आहेत. त्यामध्ये मे न्यु वैशाली स्वीट्स संत तुकाराम नगर पिंपरी पुणे यांनी अल्पोपहाराची व्यवस्था करणेकामी सर्वात लघुत्तम दरपत्रक सादर केल्याने त्यांना सामोसा ६०० नग व ३०० कप पुरवठा करणेकामी कामाचे आदेश दिले होते. मे.न्यु वैशाली स्वीट्स,पिंपरी यांनी शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३ – १४ अनुषंगाने आयोजित केलेल्या सभेस उपस्थित राहिलेल्या मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक यांचेकरीता सामोसा ६०० नग व ३०० कप चहा पुरविलेबाबत त्याकामी आलेल्या र.रु.७,६८०/- चे खर्चास मान्यता व सदरचे बील मे.न्यू वैशाली स्वीट्स,पिंपरी यांना अदा करणेस मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ४

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा. भारती फरांदे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

डॉ.हेगडेवार क्रिडा संकुलामध्ये पुरुष व महिला दोन्ही सम प्रमाणात व्यायाम करण्यास येतात परंतु व्यायाम शाळेतील पालिकेने दिलेले साहित्य अपुरे पडत असल्या कारणाने प्रस्तावात नमुद प्रमाणे व्यायामशाळेत व्यायामाचे साहित्य देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ५

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा. भारती फरांदे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर येथे २९ ऑगस्ट २०१३ क्रीडा दिना निमीत्त जलतरण स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धा अनुषंगाने सहभागी खेळाडुंना प्रमाणपत्रे व विजयी खेळाडुंना पुष्पगुच्छ व ट्रॉफिज खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु. २०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ६

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा. भारती फरांदे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

केशवनगर, प्रभाग क्र. २३ मध्ये श्री मोरया गोसावी क्रिडा संकुल आहे. तेथे विविध खेळ खेळण्यासाठी येणा-या खेळाडुंची संख्या भरपुर आहे. तसेच व्यायामासाठी, चालण्यासाठी येणा-या महिला व जेष्ठ नागरीकांची संख्यादेखील जास्त आहे. क्रिडांगणामध्ये मैदानी खेळ तसेच क्रिडांगणामध्ये असणा-या खोल्यांमध्ये कॅरम, बुध्दीबळ, टेबल टेनिस असे विविध प्रकारचे खेळ खेळण्यासाठी योग्य पध्दतीने नियोजन करुन सर्वांसाठी त्या क्रिडांगणाचा वापर व्हावा. यासाठी क्रिडांगणाच्या जागेचा वापरासंबंधी नियोजन करुन ते विकसित करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक - ७

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा. भारती फरांदे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..

कासारवाडी प्रभाग क्र.६३ मध्ये शारदा महिला औद्योगिक केंद्र आहे. त्या केंद्रामध्ये काही खोल्या रिकाम्या आहेत. त्यातील एक खोली क्रिडा विभागाकडे वर्ग करुन त्याठिकाणी महिलांसाठी फिटनेस क्लब तयार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ८

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ : मा.प्रसाद शेट्टी,मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव..

दिघी प्रभाग क्र.३१ या ठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये हॉल उपलब्ध असुन तो स्थापत्य विभागाकडे आहे. ती इमारत भूमि जिंदगी व क्रीडा विभागाकडे वर्ग करण्यात येऊन त्या ठिकाणी फिटनेस क्लब तयार करुन मिळावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – २०　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - ९

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा.प्रसाद शेट्टी　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ : मा.प्रसाद शेट्टी,मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव..

दिघी प्रभाग क्र.३१ या ठिकाणी खेळाचे आरक्षीत मैदान असुन त्या ठिकाणी व्हॉलीबॉल खेळासाठी मैदान व खेळाचे साहित्य देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – २१　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - १०

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा.भारती फरांदे　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपा च्या ३ व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या असुन त्या कायम बंद असतात, तसेच त्या ठिकाणी अस्वच्छता नेहमी असते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदर व्यायामशाळा मनपाच्या ताब्यात घेऊन मनपा मार्फत चालविणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या ३ व्यायामशाळेची मुदत संपुष्टात आल्याने त्यांचा ताबा मनपाकडे घेण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – २२　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - ११

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा.भारती फरांदे　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.६ मध्ये महानगरपालिकेची व्यायामशाळा नाही. तरी नागरीकांच्या मागणीनुसार प्रभाग क्र.६ मोशी येथे फिटनेस क्लब आधुनिक पध्दतीने महानगरपालिकेच्या शाळेमध्ये उपलब्ध जागेत सुविधा व व्यायामाचे साहित्य देण्यात यावे तसेच बौध्द वस्ती डुडुळगाव येथेही व्यायामशाळा साहित्य देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - १२

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील क्रीडांगणावर महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३५ लाख ( अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/७०३/२०१३
दिनांक – २८/०७/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.